(1)

**महाराष्ट्र राज्यमाध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर ४१६ ००४**

---

तातडीचे/परीक्षा प्राधान्य/कालमर्यादीत

क्र.कोविमं/शाखा-माध्य.गोप./स्विकृती मार्च २०१९ /2407
कोल्हापूर - ४१६ ००४
दिनांक :- ०५/१२/२०१८

प्रति,
मुख्याध्यापक,
मान्यताप्राप्त सर्व माध्यमिक शाळा,
सातारा/ सांगली / कोल्हापूर

**विषय : माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इ.१० वी) मार्च २०१९ परीक्षक/नियामक व प्रात्यक्षिक परीक्षा अंतर्गत/बहिस्थ परीक्षक नेमणुकीबाबत...**

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इ.१० वी) मार्च २०१९ प्ररीक्षेसाठी परीक्षक/नियामक नेमणुकीसंदर्भात आपणाकडून मंडळास प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे आपल्या शाळेत कार्यरत असलेल्या शिक्षकांची माहिती मंडळाने अद्यावत केलेली असून सदरची संगणकीय माहिती या पत्रासोबत विहीत नमुन्यात आपणांकडे पाठविण्यात येत आहे. सदर माहितीमध्ये विषयाचा सांकेतिक क्रमांक, नाव व माध्यम, परीक्षक/नियामक नियुक्ती क्रमांक, शिक्षकाचे नाव, सेवानिवृत्ती दिनांक, परीक्षक/नियामक कामकाजाचे टर्न, शिकविण्याचा अनुभव वर्षे, मोबाईल नं., बँक खाते क्रमांक व आयएफसी कोड, इत्यादींचा यादीत समावेश केला आहे.

**यादीबाबत आपण खालीलप्रमाणे कार्यवाही करावयाची आहे.**

या कार्यालयाच्या क्र.कोविमं/शाखा-माध्य. गोप./पॅनेल २०१९-२१/१६६९, दि. २५/०९/२०१८ च्या पत्रान्वये करण्यात यावयाची कार्यवाही कळविण्यात आलेली आहे. या व्यतिरिक्त खाली नमूद केलेल्या सूचनांची कार्यवाही काटेकोरपणे करण्यात यावी.

१) उत्तरपत्रिकांचे गठ्ठे प्राप्त झाल्यानंतर शिक्षक नाही या सबबीखाली कोणत्याही परिस्थितीत कोणताही गठ्ठा मंडळाकडे परत पाठवू नये.

२) आपल्या शाळेत संबंधित विषय शिकविला जात असल्याने प्राप्त झालेला गठ्ठा मुख्याध्यापकांनी त्यांचे स्तरावर पर्यायी व्यवस्था करुन तपासून घेणेचा आहे याची नोंद घ्यावी. सदर पर्यायी व्यवस्थेबाबत मंडळास अवगत करण्यात यावे.गणित व विज्ञान विषयाच्या इंग्रजी माध्यमाच्या (सेमी) उत्तरपत्रिका या विषयाचे मराठी माध्यमातून अध्यापन करणाऱ्या शिक्षकांनाही परिक्षक म्हणून मुल्यमापनासाठी दिल्या जातील

३) साधारणपणे फेब्रुवारी महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापासून शास्त्र व तंत्र विषयाच्या प्रात्यक्षिक परीक्षा होतील. प्रात्यक्षिक परीक्षांचा सविस्तर तपशील आपणांस यथावकाश कळविण्यात येईल. तथापि प्रात्यक्षिक परीक्षेचे पूर्वनियोजन करण्यासाठी या कार्यालयात शास्त्र व तंत्र विषय शिकविणा-या शिक्षकांची माहिती तातडीने पाठविणे आवश्यक आहे. तरी या सोबत जोडलेल्या स्विकृत्तीपत्रामध्ये आपल्या शाळांची आवश्यक ती सविस्तर माहिती भरून दि. १७/१२/२०१८ रोजी संबंधित वितरण केंद्रावर हस्तपोच पाठवून द्यावी. तंत्र व शास्त्र शिक्षकांची माहिती अर्धवट अगर चुकीची कळविल्यास व त्यामुळे विद्यार्थ्यांची गैरसोय झाल्यास व प्रात्यक्षिक परीक्षा वेळेत न झाल्यास त्याबाबतची जबाबदारी संबंधित मुख्याध्यापकांवर राहील.

४) बऱ्याचशा इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये उत्तरपत्रिका तपासणीसाठी पाठविण्यात येतात तेव्हा असे निदर्शनसास येते की उत्तरपत्रिकांचे गठ्ठे प्राप्त झाल्यानंतर संबंधित विषयाचे शिक्षक नोकरी सोडून गेल्याचे सांगितले जाते अशा वेळी सदरच्या उत्तरपत्रिकांची तपासणी करुन घेण्याची जबाबदारी संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांची राहील याची नोंद घ्यावी.

५) उपरोक्त यादी संबंधित शिक्षकांच्या निदर्शनास आणून त्यावर सर्व शिक्षकांची स्वाक्षरी घ्यावी व मुख्याध्यापक यांनी स्वता:चे नाव नमूद करून पुढे मुख्याध्यापक असे स्पष्ट लाल शाईने नोंदवावे.

***यादीच्या शेवटी मुख्याध्यापक यांनी नाव, स्वाक्षरी व मोबाइल नंबर नमूद करणे बंधनकारक आहे.***

**शिक्षकांची स्वाक्षरी घेताना खालील सूचना त्यांना अवगत करून अद्यावत माहिती सादर करावी.**

अ) शासनाच्या म.खा.शा.सेवाशर्ती नियम १९८१ मधील सेवकाचे कर्तव्य नियम क्र.२२(१) अंतर्गत मधील अनुसूची (अ) मधील ४ (१८,१९) नुसार सर्व शिक्षकांना मंडळाच्या परीक्षेचे काम स्विकारणे अनिवार्य आहे. त्यामुळे पाठविलेल्या नियुक्त्या स्विकारणे सर्व शिक्षकांना बंधनकारक राहील याची संबंधितांना जाणीव करून द्यावी.

ब) जे शिक्षक परीक्षेचे काम अपरिहार्य असतांना माहिती भरण्यास टाळाटाळ करतील अगर माहिती भरणार नाहीत त्यांचेवर संस्थेमार्फत कारवाई करून त्याची माहिती या कार्यालयाकडे पाठवावी. याबाबत तत्परता दाखविण्याची जबाबदारी मुख्याध्यापक यांची राहील.

क) अपूर्ण माहिती, अर्थबोध न होणाऱ्या अगर अर्धवट माहितीच्या पत्रांबाबत होणाऱ्या संभाव्य अनिष्टास संबंधित मुख्याध्यापक जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी.

इ) ज्या परीक्षक/नियामक यांच्यावर मंडळ शिक्षासूचीनुसार प्रतिबंधात्मक कारवाई झाली असेल, त्यांची स्वाक्षरी न घेता त्याच प्रपत्रात लाल शाईने शेरा या कॉलममध्ये शेरा लिहून कळवावे.

ई) जे शिक्षक सेवानिवृत्त, मयत झालेले आहेत, अगर नजीकच्या काळात जून २०१९ पूर्वी सेवानिवृत्त होणार आहेत, विषय शिकवित नाहीत, गंभीर आजारग्रस्त (उदा.कॅन्सर, टी.बी., ह्रदयाचे ऑपरेशन) किंवा अभ्यास मंडळ सदस्य असतील अशांची माहिती या कार्यालयास शेरा या कॉलममध्ये लाल शाईने नमूद करावी. याबाबत समाधानकारक पुरावा जोडावा.

उ) सदरच्या संगणकीय यादीमध्ये काही ज्येष्ठ परीक्षकांना आवश्यकतेनुसार इंग्रजी व मराठी माध्यमांसाठी नियामक म्हणून बढती देण्यात आलेली आहे. यासंदर्भात संबंधित शिक्षकांना अवगत करण्यात येवून स्वाक्षरी घेण्यात यावी. सदर शिक्षकांच्या माहितीमध्ये काही दुरूस्त्या असल्यास त्या लालशाईने त्याच संगणकीय फॉर्ममध्ये त्याच जागी नोंदवाव्यात.

ऊ) यापूर्वी ज्या शिक्षकांनी प्रमुख नियामक म्हणून काम केलेले आहे अशा शिक्षकांची परीक्षक म्हणून काम करण्याची तयारी असेल तर त्यांना अनुक्रमाने आवश्यकतेनुसार काम देण्यात येईल.

ज्या शिक्षकांची माहिती जाणीवपूर्वक पाठविली जाणार नाही अशा संबंधित शाळेवर मंडळ नियमानुसार जरुर ती शाळा संकेतांक काढून घेण्याची कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी. तरी सर्व सूचनांचे पालन करून परीक्षा सुरळीत पार पाडणेसाठी शिक्षकांची माहिती व बँक खात्याबाबतची माहिती विहित मुदतीत पाठवून मंडळास सहकार्य करावे.

*** महत्वाचे ***

*बऱ्याच शाळांतील मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक व पर्यवेक्षक हे सामान्यत: इंग्रजी, गणित व विज्ञान हे विषय शिकवतात. मात्र ते प्रशासकीय कारणास्तव उत्तरपत्रिका तपासणीस नकार देतात. उपलब्ध शिक्षक कमी पडल्यामुळे उत्तरपत्रिका तपासणी वेळेत होत नाही. शासन आदेशानुसार मार्च परीक्षेच्या निकालानंतर लगेच पुरवणी परीक्षा घ्यावयाची असल्याने मार्च परीक्षेची निकाल प्रक्रिया तातडीने पार पाडावी लागणार आहे. तसेच मान्यताप्राप्त शिक्षकांनीच उत्तरपत्रिका तपासणी/नियमनाचे काम करावयाचे असल्याने आवश्यकतेनुसार मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक यांना उत्तरपत्रिका तपासणीचे काम देण्यात येईल याची नोंद घ्यावी.*

सदरच्या यादीवर संबंधित शिक्षकांची स्वाक्षरी घेवून ही यादी दि. १७/१२/२०१८ रोजी खास दुताकरवी हस्तपोच संबंधित वितरण केंद्रावर जमा करावी. "सर्व शिक्षकांची माहिती दिल्या खेरीज आवेदनपत्राची यादी स्वीकारली जाणार नाही याची नोंद घ्यावी ". कोणत्याही परिस्थितीत वेळेचे बंधन पाळावे.सदरची माहिती दि.१७/१२/२०१८ पर्यंत न दिल्यास माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा मार्च २०१९ परीक्षेस आपल्या शाळेमार्फत प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रवेशपत्र रोखण्यात येईल. तसेच सदरची माहिती अंतिम समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.याची नोंद घेण्यात यावी.

विभागीय सचिव,<br>
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

प्रत:

१. मा.शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर विभाग,कोल्हापूर
२. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प. सातारा/सांगली/कोल्हापूर
३. अधिक्षक, वेतन विभाग, वेतन विभाग कार्यालय, सातारा/सांगली/कोल्हापूर